# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - 400 001.वेबसाईट: www.msbnpe.orgई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: 8652281026

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001Website:www.msbnpe.orgE-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- 8652281026


मराशुवपशिम/7617/२०२१ दिनांक :-05/०८/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्न जी.एन.एम./ए.एन.एम. संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता विदयार्थी इनरोलमेंट लिंक सुरु करणेबाबत.

संदर्भ: १. F.No:१-६/(LT)-२०२१-INC Dated : ८ March २०२१
२. MSBNPE/Enrol./ANM/GNM/२०२०-२१/६८४०/२०२१ Date - २६/०३/२०२१
३. मराशुपशिम/६८७३/२०२१ दिनांक ३१/०३/२०२१
४. मराशुपशिम/६९१८/२०२१ दिनांक ०५/०४/२०२१
५. मराशुपशिम/७१०८/२०२१ दिनांक २१/०५/२०२१

सर्व संस्थेतील प्राचार्य / संस्थाप्रमुख यांना उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळ मार्फत विदयार्थी इनरोलमेंट शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता, संदर्भ पत्र क्रं २ नुसार २६/०३/२०२१ ते दि. ३१/०३/२०२१ पर्यंत लिंक सुरु करण्याबाबत मंडळाच्या संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. त्यांनतर ब-याच संस्थाचे इनरोलमेंट बाकी असल्यामुळे मंडळामार्फत इनरोलमेंटची मुदत संदर्भ पत्र क्र ५ नुसार दिनांक २१/०५/२०२१ ते २८/०५/२०२१ रोजी पर्यंत वाढविण्यात आलेली होती. परंतू काही संस्थांना इनरोलमेंट लिंक मुदत संपल्यानंतर कोवीड -१९ या रोगामध्ये जिल्हाबंदी असल्यामुळे तसेच तांत्रिक कारणामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता विदयार्थी प्रवेशीत करता आलेले नाहीत. या विषयावर मंडळाच्या दिनांक २९/०७/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता खालील बाबी मान्य करण्यात आल्या.

१. विदयार्थी इनरोलमेंट लिंक दिनांक ०६/०८/२०२१ ते ०७/०८/२०२१ रोजी सुरु करण्यात येत आहे.

२. सदंर्भ क्र. १ भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली यांच्या परिपत्रकानुसार दिनांक ३१ मार्च २०२१ हि अंतिम तारीख असल्याबाबत कळविण्यात आलेले होते ज्या संस्थानी या तारखेस व या तारखेच्या नंतर मंडळाच्या ईमेलवर प्रवेशीत केलेल्या विदयार्थ्यांची यादी पाठविण्यात आलेली होती असेच विदयार्थी नोंदणी करावेत.

३. ज्या संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२१ या तारखेच्यानंतर मान्यता मिळाली आहे अशा संस्थानी प्रवेशित केलेले विदयार्थी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी गृहीत धरण्यात येतील.

४. विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास संबधीत प्राचार्य/संस्था जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ